खूप सारे बोजो

लिलियन मूर, चित्र: सुसान पर्ल

मराठी: अश्विनी बर्वे



खूप सारे बोजो

लिलियन मूर

चित्र: सुसान पर्ल

मराठी: अश्विनी बर्वे

"आई," डॅनी ड्रेकने म्हटले.

''मला एक कुत्रा मिळेल का?"

डॅनीच्या आईने डॅनीकडे बघितले.

''डॅनी ड्रेक,'' आई म्हणाली.

''तू मागच्याच आठवड्यात हे विचारले होते.

आणि मी काय म्हटलं होतं?"

''नाही,'' डॅनी म्हणाला.

''त्याच्या मागच्या आठवड्यात पण तू हेच विचारले होते मला." त्याची आई म्हणाली. "आणि मी काय उत्तर दिले होते?"

''नाही," डॅनी म्हणाला.

डॅनीची आई म्हणाली, "नाही! मला माफ कर डॅनी.

आपलं घर एका कुत्र्यासाठी खूप छोटे आहे."

"पण माझ्याकडे कुत्र्यासाठी एक चांगले नाव आहे,"

डॅनी म्हणाला. "मला त्याला बोजो म्हणून हाक मारायची आहे."

नाही डॅनी!" त्याची आई म्हणाली. मग डॅनीला कळले की आता त्याची गप्प बसण्याची वेळ आली आहे.

डॅनी खेळायला बागेकडे गेला. तो पूर्ण सकाळभर त्याचा मित्र पीट बरोबर तो खेळत राहिला.

ते एका जहाजावर समुद्री डाकू असल्याचे नाटक करत होते.



त्याच्यासाठी बागेतली छोटीशी नदी खूप मजेदार होती.

समुद्री डाकू आपल्या जहाजात नदीवर वरखाली फिरत असत.

डॅनीने सगळ्यात आधी एक छोटे बेडूक बघितले.

त्याला लगेच ते पाळावे वाटू लागले.

पीटने बेडूक पकडायला त्याला मदत केली. त्यांना एक डबा सापडला आणि त्यांनी त्यात बेडूक ठेवले. मग डॅनीने बेडकाला घरी आणले.

“व्वा! काय भारी आहे!” डॅनीने बेडकाला म्हटले.

“मी तुला शोधून काढलं याचा मला खूप आनंद झाला आहे.”

“तुला बघून आई हैराण होईल.”

आई हैराण झाली जेव्हा डॅनीने बेडकाला वर उचलून दाखवले.

“आता माझ्याजवळ पाळीव प्राणी आहे,”

त्याने आईला सांगितले.

“तुला याला हातात घ्यायचे आहे का?”

“नाही,” डॅनीची आई म्हणाली.

“मी माझ्या पाळीव प्राण्याचे नाव बोजो ठेवेन.”

डॅनी म्हणाला, “बोजो बेडूक.”

“कृपया बोजो बेडकाला आपल्या खोलीतच ठेव,”
डॅनीची आई म्हणाली.

डॅनीने बोजो बेडकाला आपल्या खोलीत ठेवले. आणि त्याची चांगली काळजी घेतली. त्याने त्याच्यासाठी एक चांगले घर तयार केले आणि त्याला खाण्यासाठी मासाचे तुकडे दिले.

बेडूक किती मजेशीर होता. आणि तो किती उंच उड्या मारत होता. आधी डॅनीने पुस्तक खाली ठेवले. बोजो त्याच्यावरून उडी मारून गेला. मग डॅनीने दोन पुस्तके ठेवली, मग तीन. पण बोजो त्या सर्वांवरून उडी मारून गेला.

एक दिवस बोजोने अशी उडी मारली. त्या दिवशी खोलीचा दरवाजा उघडा होता. बोजो दरवाज्यातून बाहेर गेला. उड्याच उड्या!

तो डॅनीच्या खोलीच्या बाहेर गेला. इकडेतिकडे उड्याच उड्या, तो इकडेतिकडे फिरत राहिला. आता तो पूर्ण घरात उड्या मारू लागला होता.

शेवटी बोजोला सगळ्यात चांगली जागा मिळाली. ती पाण्याची जागा होती. म्हणून त्याने सरळ त्यात उडी मारली. आता तो स्वयंपाक घराच्या सिंक मध्ये होता. सिंकमध्ये भांडी ठेवलेली होती. तिथे डॅनीच्या आईची सगळी प्रिय भांडी होती. त्या सर्व भांड्यात तो बसला.

डॅनीची आई भांडी घासायला आली.

बोजोला बघताच ती ओरडली.

बोजो एवढा घाबरला की त्याने पटकन सिंकच्या बाहेर उडी मारली ती सरळ डॅनीच्या आईच्या अंगावर.

“माझ्या सिंकमध्ये बेडूक! ओह!आई ओरडली.

“डॅनी तू आधी त्या बेडकला घराच्या बाहेर काढ!”

दुःखी होऊन डॅनीने बोजोला डब्यात घातले आणि तो बागेकडे निघाला.

रस्त्यात त्याला बिली भेटला.

“बघ माझ्याजवळ काय आहे?” बिली म्हणाला.

त्याने एक छोटासा पिंजरा वर उचलून दाखवला.

“बघ माझ्याजवळ काय आहे?” डॅनी म्हणाला.

त्याने डबा उघडून दाखवला आणि तिथेच दोघांनी अदलाबदल केली.

बिल्लीने डबा घेतला आणि डॅनीने पिंजरा.

डॅनी धावत घरी गेला.

“अरे यार!” तो मनातल्या मनात म्हणाला.

“मला बिलीला भेटून किती आनंद झाला आहे. पण आई हैराण होईल का?

आई हैराण झाली.

डॅनीने तिला पिंजरा वर उचलून दाखवला.

त्यात छोटा पांढरा उंदीर होता.

“हा मी पाळलेला प्राणी आहे,”

डॅनी म्हणाला. “मी याला बोजो म्हणेन.
बोजो उंदीर”

डॅनीने उंदराला बाहेर काढले आणि त्याला आपल्या स्वेटरवर ठेवले.

“बघ आई!” तो ओरडला. “बघ बोजो काय करतो आहे.

“तुला त्याला हात लावायचा आहे का?”

“नको, धन्यवाद,” डॅनीची आई म्हणाली. “आणि डॅनी त्या उंदराला आपल्या खोलीतून बाहेर पडू देऊ नकोस.”

“नक्कीच आई,” डॅनी म्हणाला.

“बोजो नक्कीच सिंकमध्ये जाणार नाही.”

डॅनीने बोजो उंदराची चांगली काळजी घेतली. त्याने बोजोचा पिंजरा साफ केला. त्याला खायला प्यायला दिले. तो रोज बोजो बरोबर खेळत असे. बोजो उंदीर सिंकमध्ये गेला नाही. पण एका सकाळी तो आपल्या पिंजऱ्यातून बाहेर निघाला, तो डॅनीच्या खोलीतून बाहेर पडला आणि स्वयंपाकघरात गेला.

उंदीर वास घेत म्हणाला, स्वयंपाक घरातून चांगला सुगंध येत आहे. डॅनीच्या आईने नुकताच विक्रीसाठी मोठा केक केला होता. जोपर्यंत बोजो उंदराने केक बघितला नाही तोपर्यंत तो विक्रीसाठी होता. बोजोला केक खूप आवडला.

जेव्हा डॅनीच्या आईने आपल्या केककडे बघितले. तेव्हा ती चिडली,"माझा केक! ओह, माझा प्रिय प्रिय केक!" मग ती म्हणाली, "डॅनी त्या केक खाणाऱ्या उंदराला लगेच घराच्या बाहेर काढ." दुःखी होऊन डॅनीने बोजो उंदराला पिंजऱ्यात घातले.

"बोजो उंदराला घेऊन जाण्यासाठी सगळ्यात चांगली जागा म्हणजे पाळीव प्राण्याचे दुकान असेल. कारण बिलीने तिथूनच उंदीर खरेदी केला होता."

मग डॅनीने बोजो उंदराला दुकानात नेले. पाळीव प्राण्याचा दुकानदार पांढरा उंदीर बघून खूप खुश झाला. डॅनी आणि पाळीव प्राण्याच्या दुकानदाराने कशाची तरी अदलाबदल केली.

"त्यात काय आहे?" आईने विचारले.

डॅनीने डबा उघडून दाखवले,

"ही मुंग्यांची वसाहत आहे," डॅनी म्हणाला.

"या सगळ्या मुंग्या काम करत आहेत. मी त्यांना काम करतांना आणि त्या जे काही करतील ते बघू शकतो."

"मुंग्या?" डॅनीची आई ओरडली.

"आता मला पूर्ण घरात फक्त मुंग्याच मुंग्या दिसतील. घरात एकही मुंगी नाही, डॅनी. आणि मी खरच सांगते."

"आई," शेवटी डॅनी म्हणाला.

“मला कोणतान कोणता प्राणी पाळायचाच आहे.

“हो, हे मला पक्क माहीत आहे,” आई म्हणाली.

आईने डॅनीला जवळ घेतले. “मला तुझ्यासाठी एका योग्य पाळीव प्राण्याची माहिती आहे,” आई म्हणाली.

“तो बेडकापेक्षा चांगला आहे?” डॅनीने विचारले.

“खूपच चांगला,” त्याची आई म्हणाली.

“तो पांढऱ्या उंदरापेक्षा पण चांगला आहे?”

“खूप खूप चांगला,” त्याची आई म्हणाली.

“तो मुंग्यांच्या वसाहती पेक्षा चांगला आहे?”

“हो!हो!” त्याची आई म्हणाली.

“खूप खूप खूप चांगला!”



“डॅनी” आई म्हणाली.

“तुला कुत्रा कसा वाटेल?”

“एक कुत्रा!” डॅनी ओरडला, “एक कुत्रा”

“एक छोटा कुत्रा,” डॅनीची आई म्हणाली.

“कारण आपलं घर छोटं आहे. एक खराखुरा छोटा कुत्रा.”

“अरे व्वा!” डॅनी म्हणाला. “एक कुत्रा!

आणि बघ मी त्याला काय नाव देईन.”

“बोजो,” डॅनीची आई म्हणाली.

“किती आश्चर्याची गोष्ट आहे!”